“मराठवाड्यातील आंध आदिवासी जमातीची

सामाजिक-सांस्कृतिक, धार्मिक व

आर्थिक परिस्थिती एक : ऐतिहासिक विश्लेषण”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखे अंतर्गत इतिहास या विषयामध्ये

पिएच.डी.पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक विद्यार्थी

गारोळे साहेबराव शंकर

मार्गदर्शक

डॉ. बोकारे तुकाराम एकनाथराव

इतिहास विभाग प्रमुख

श्री दत्त कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हदगाव, जि. नांदेड.

संशोधन केंद्र

नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी

सप्टेंबर 2022

❖ प्रस्तावना

नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी, असे सामान्यपणे म्हणता येईल. सर्वसाधारणपणे जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यांत व अन्य बहुसंख्या समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात ते तुरळक वस्ती करून राहतात. नागर संस्कृतीचा त्याचप्रमाणे वर्गश्रेणीबद्ध समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीती किंवा 'संस्कृती' आदिवासींत आढळतात. अर्थात जगातील सर्व आदिवासी त्या त्या प्रदेशातील मूळ रहिवासी आहेतच, असे ठामपणे म्हणता येत नाही. परंतु दुसऱ्या सर्वमान्य संज्ञेच्या अभावी आदिम संस्कृतीची दर्शक अशी आदिवासी हीच संज्ञा रूढ झाली आहे. अनेक नागर संस्कृतींचे उदयास्त झाले, परंतु त्यांच्याशी संपर्क न साधल्यामुळे किंवा न आल्यामुळे आदिवासी जमाती जशाच्या तशाच राहिल्या. त्यांच्यात हजारो वर्षे विशेष परिवर्तन झाले नाही.

कोणत्याही देशाची राज्याची तसेच प्रादेशिक परिसराची ओळख ही प्रामुख्याने तेथील संस्कृती वरून होत असते.संस्कृती म्हणजे केवळ राहणीमान नसून दैनंदिन जीवनशैली, रुढी, प्रथा, परंपरा या गृहीतकांचा मिलाप म्हणजे संस्कृती होय. निसर्गाशी साधर्म्य असलेली जीवनशैली, श्रम साधना, स्वाभिमान यांची चालीरीती, रुढी, प्रथा, सन-समारंभ अशा सर्व पैलूंनी साधारण असलेल्या या आंध आदिवासी जमातीची संस्कृती ही इतर सर्व सामान्य समुदायापासून पूर्णतः भिन्न आहे.

महाराष्ट्रातील नांदेड, हिंगोली, परभणी, यवतमाळ, वाशिम, अकोला या जिल्ह्यामध्ये आंध आदिवासी ही जमात प्रामुख्याने जास्त प्रमाणात आढळून येते. म्हणून संशोधनासाठी निवडलेला विषय हा विशेषत: मराठवाड्यातील आंध आदिवासी जमातीवर जास्त प्रमाणात भर दिलेला आहे.

या आंध आदिवासी जमातीच्या सामाजिक-सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचे ऐतिहासिक विश्लेषणात्मक संशोधन प्रस्तुत शोधकार्यात केले जाणार आहे.

- **विषय निवडीचा उद्देश :**

“ मराठवाड्यातील आंध आदिवासी जमातीची सामाजिक-सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक परिस्थिती : एक ऐतिहासिक विश्लेषण ” हा संशोधनाचा विषय निवडण्यासाठी अनेक कारणे कारणीभूत ठरली आहेत. आंध आदिवासी जमातीची वस्तीस्थाने रुढी,प्रथा,परंपरा,सण-उत्सव, राहणीमान ह्या सर्व पद्धती इतर सर्व सामान्य समुदायापेक्षा पूर्णतः भिन्न आहेत.

अशा या आंध आदिवासी जमातीच्या मूळ वंशाचा उलगडा होणे गरजेचे आहे. आणि त्याच प्रमाणे त्यांचा सातवाहन घराण्याशी ऐतिहासिक संबंध जोडला जात आहे यावरही प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

तसेच अशा या आंध आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. आणि आंध आदिवासी जमातीवर ऐतिहासिक दृष्टिकोनातून फारसे संशोधन झालेले नाही. यास्तव प्रस्तुत शोध विषय सदरील संशोधनासाठी निवडलेला आहे.

- **संशोधन विषयाची पार्श्वभूमी :**

इतिहासाच्या जडणघडणीत देश राज्य प्रांत यातील प्रत्येक समुदायातील घटकाचा अनमोल वाटा असतो. प्रत्येक स्तरावरील समुदायाच्या माध्यमातून स्थळ काल आणि सापेक्ष इतिहास घडत असतो. स्थानिक प्रदेशातील इतिहासातूनच राष्ट्रीय व सांस्कृतिक इतिहासाची मुलभूत घटके आकार घेत असतात. महाराष्ट्रात राहणाऱ्या अनेक जाती जमातीच्या संस्कृतीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात अनेक समुदायाचे लोक राहतात त्यातील आदिवासी समुदायाची वेगळी संस्कृती हे त्यांचे

इतर समुदायापासून असलेली भिन्नता सिद्ध करते. अशा या आदिवासी जमातीपैकी आंध ही एक जमात आहे. या जमातीचे इतर आदिवासी जमातीप्रमाणे त्यांचेही वेगळे सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहे.

❖ संशोधनाची आवश्यकता :

प्रस्तुत विषयावर संशोधन करणे अनेक पैलूंनी महत्त्वाचे ठरणार आहे त्यातील काही पैलू खालील प्रमाणे आहेत.

१) सातवाहन घराण्याशी संबंधित असलेल्या या आंध आदिवासी जमातीच्या अभ्यासाने ऐतिहासिक तथ्यावर प्रकाश पडणार आहे. या दृष्टिकोनातून अभ्यास करणे महत्वपूर्ण ठरणार आहे.

२) इतिहासाच्या वाटचालीमध्ये अनेक जाती-जमातीचे महत्त्वपूर्ण असे योगदान आहे. त्यापैकी एक म्हणजे आंध आदिवासी जमात होय. त्यांचे ब्रिटिश व निजामकालीन लढ्यातील योगदान स्पष्ट करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत विषयावर संशोधन करणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

३) आंध आदिवासी जमातीची स्वतःची अशी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे. ती काळाच्या ओघात आज लोप पावत चालली आहे, त्या दृष्टीने ऐतिहासिक दस्तावेज म्हणून संशोधन करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

४) आदिवासी जमातीपैकी आंध ही एक जमात असून त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरा, सण- उत्सव, रितीरिवास, समाजात असलेली अंधश्रद्धा, त्यांच्या देवी-देवता व भाषा यांच्यावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने ही प्रस्तुत संशोधन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

५) तसेच अशा या आंध आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, आणि धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

❖ **संशोधनाची गृहितके :**

प्रस्तावित विषयाचे संशोधन करत असताना संशोधनासाठी आवश्यक असणारी गृहीतके खालील प्रमाणे मांडण्यात आलेली आहेत.

1) आंध आदिवासी जमातीचे मूळ वंशज व ऐतिहासिक वाटचालीचा उलगडा झालेला नाही.

2) आंध आदिवासी जमातीने ब्रिटिश व निजाम कालीन लढ्यामध्ये दिलेल्या योगदानाचा पुरेसा उलगडा झालेला नाही.

3) आंध आदिवासी जमातीवर इतर समुदायाचा सामाजिक-सांस्कृतिक व धार्मिक रुढी, प्रथा, परंपरांचा परिणाम झालेला दिसून येतो.

4) आंध आदिवासी जमातीमध्ये वारकरी संप्रदायाचा उदय व विस्तार झालेला दिसून येतो.

५) सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक दृष्ट्या स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील आंध आदिवासी जमातीमध्ये अपेक्षेप्रमाणे सुधारणा झालेली नाही.

❖ **संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत संशोधन विषयासाठी खालील प्रमाणे उद्दिष्टे समोर ठेवून विषयाची मांडणी करण्यात आली आहे.

१) आंध आदिवासी जमातीचा ऐतिहासिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) नव्याने प्राप्त होणाऱ्या दस्तऐवजांचा अभ्यास करून आंध आदिवासी जमातीच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीशी संबंधित ऐतिहासिक माहिती व पुरावे शोधणे.

३) आंध आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक व धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा चालीरीतीचा अभ्यास करणे.

४) आंध आदिवासी जमातीच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

५) आंध आदिवासी जमातीच्या समाज व संस्कृतीचे महत्त्व कोणते आहे हे ज्ञात करणे.

६) आंध आदिवासी जमातींच्या वारकरी संप्रदायाचा उदय व विस्ताराचा अभ्यास करणे.

७) आंध आदिवासी जमातींच्या ब्रिटिश व निजामकालीन लढ्यातील योगदानाचा अभ्यास करणे.

❖ **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय "**मराठवाड्यातील आंध आदिवासी जमातीची सामाजिक-सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक परिस्थिती : एक ऐतिहासिक विश्लेषण**" अशा स्वरूपाचा आहे.

सदरील संशोधनात महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी या जिल्ह्यातील आंध आदिवासी समुदायाचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करण्यात येईल. आंध आदिवासी जमात ही तेलंगणा, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रात पसरलेली आहे. पैकी फक्त महाराष्ट्रातील आणि विशेषतः मराठवाड्यातील आंध आदिवासी जमातीवरच सखोल संशोधन हि या शोधकार्याची मर्यादा आहे.

❖ **संशोधन अभ्यासाच्या पद्धती :**

मानव्य विद्या शाखेअंतर्गत इतिहास या विषयामध्ये संशोधन अध्ययन करत असताना मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रासंबंधीत भूतकालीन घटनांची माहिति पुराव्याच्या आधारे वस्तुनिष्ठ

पद्धतीने मांडण्याचे कार्य ऐतिहासिक संशोधन पद्धतीतून प्राचीन काळापासून केले जाते. प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक, आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब शोधकर्त्या कडून केला जाणार आहे.

ऐतिहासिक संशोधन म्हणजे गतकालीन घटनांच्या विकासाचे व अनुभवाचे सूक्ष्म अन्वेषण ज्यामध्ये भूतकालीन माहितीचे संतुलित व यथार्थ विवेचन व त्याचे काळजीपूर्वक केलेले परीक्षण संमेलन असते. त्यामुळे आपणास ऐतिहासिक संशोधन पद्धती महत्त्वपूर्ण ठरते. वर्तमानकालीन सद्यस्थितीमध्ये विविध समस्या समाजातील विविध प्रवृत्ती इत्यादी संबंधित वस्तुस्थिती जनक माहिती मिळविण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती उपयुक्त ठरते. या पद्धतीचा आदर्श मुलक व सर्वेक्षण पद्धती असी ही नावे प्रचलित आहेत. त्यामुळे या पद्धतीचा संशोधनात उपयोग करण्यात येईल.

❖ **संशोधन साधने :**

अ) प्राथमिक साधने

१) महाराष्ट्र आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था ,पुणे

२) आदिवासी वस्तूसंग्रहालय, हैदराबाद

३) आदिवासी आयुक्त कार्यालय ,नाशिक

४) पारंपारिक वेशभूषा, संगीत ,साहित्य व अवजारे इत्यादी ऐतिहासिक माहिती देणारे संशोधन साधने.

५) प्रश्नावली

६) मुलाखती

ब) दुय्यम साधने

१)संशोधनात्मक ग्रंथ

2) वृत्तपत्रे

3) मासिके

4) इंटरनेट वरील अद्यावत माहिती

5) निरीक्षण

❖ **प्रबंधाची प्रकरणे**

❖ **प्रकरण पहिले : संदर्भित पूर्व साहित्यांचा आढावा व संशोधन पद्धती**

या प्रकरणांमध्ये आंध आदिवासी जमातीवर आधारित विविध संदर्भ साहित्यांचा व संशोधनाचा मागोवा घेण्यात येईल. यासाठी विविध ग्रंथ, नियतकालिके, गॅजेट, संशोधन पत्रिका, मासिके, इत्यादी साधन सामग्रीचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

▪ **प्रकरण दुसरे : आंध आदिवासी जमात : एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप**

इतिहास लेखनाच्या निकषांमध्ये आंध आदिवासी जमातीचे पूर्वज आंध्र जमातीचे असल्याचे व आंध्र जमातीचे वंशज आंध जमात असल्याचे वैदिक, जैन, बौद्ध साहित्य, पुराना मध्ये व शिलालेखांमध्ये अगदी स्वयंस्पष्ट शब्दांमध्ये नमूद केले आहे. आंध जमात ही आंध्र वंशाचे नाहीत असे म्हणण्यासाठी एकही आधार आंध-आंध्रांचा मानसिक संबंध नाकारणारे इतिहासकार देऊ शकणारे नाहीत. आंध्रचे वंशज 'आंध' जमात किंवा आंध्र जमातीचे वंशज आहे, हे सिद्ध करणारे भक्कम पुरावे आहेत. प्राचीन कालखंडात मराठवाड्यात मुलक, अश्मक, भोगवर्धन आधी जनपदे अस्तित्वात होती तसेच आंध्रामध्ये आंध्रदेश या नावाने राज्य असल्याचा प्राचीन साहित्यात उल्लेख आहे. तसेच आंध्र (आंध) जमातीचा सातवाहन घराण्याशी संबंध आहे.

सातवाहन वंशाचा सर्वप्रथम उल्लेख ऐतरेयण ब्राह्मणमध्ये आंध्र म्हणून आलेला आहे.

विद्वानांच्या मते सातवाहन शब्दाचा अपघात होऊन तो शालिवाहन या शब्दात सर्वत्र प्रसिद्ध झाला.

- **प्रकरण तिसरे : ब्रिटिश व निजामकालीन लढ्यातील आंध आदिवासी जमातीचे योगदान**

आंध जमात प्राचीन काळापासून एक अन्यायाविरुद्ध लढणारी लढाऊ जमात आहे. इंग्रजा विरुद्धच्या लढ्यामध्येही वेगवेगळ्या पद्धतीच्या लढ्यात आंध आदिवासी जमातीचा सहभाग लक्षणीय होता. क्रांतिवीर सोमा डोमा आंध, हुतात्मा संभाजीराव नखाते यांच्यासारख्या अनेक शौर्य वीरांनी ब्रिटिशाविरुद्धच्या लढ्यामध्ये योगदान दिले आहे. स्वातंत्र्यापूर्वी विदर्भ हा प्रदेश इंग्रजांच्या प्रत्यक्ष ताब्यात होता, तर मराठवाडा हा इंग्रजांचे मांडलिक संस्थान निजामाच्या ताब्यात होता. इंग्रजांच्या ताब्यातील विदर्भामध्ये आंध जमातीच्या अनेक घराण्याकडे पाटीलकीचे अधिकार होते. संत मुंगसाजी महाराजांचे अंभोरे घराणे त्यापैकी एक होते.

- **प्रकरण चौथे : आंध आदिवासी जमातीचे सामाजिक-सांस्कृतिक व धार्मिक जीवन**

या प्रकरणांमध्ये आंध आदिवासी जमातीची जडणघडण, लोककला, रूढी, प्रथा, परंपरा, बोलीभाषा, हावभाव, लोकगीते,कलाकुसरीच्या पद्धती,जीवनशैली, सण-उत्सव, या आंध आदिवासी जमातीचे देवी-देवता, त्यांचे खानपान, नृत्य, समारंभ, लग्नप्रथा आदी बाबींचा समावेश या प्रकरणात असेल.

आंध आदिवासी जमातीची प्राचीन काळापासून सामाजिक जडणघडण कशी झाली आहे, आणि बदलत्या काळानुसार त्यांच्यात झालेले परिवर्तन कसे आहे. सामाजिक जीवन ते मुख्य प्रवाहापासून दूर राहून जगत असत.

गरिबी, अज्ञान, अंधश्रद्धा यासारख्या समस्या या जमातीमध्ये आढळून येतात. कुपोषण, बालविवाह, कुमारी माता, हुंडा प्रथा यासारख्या समस्यांचाही सामना आंध आदिवासी जमातीला करावा लागतो.

तसेच वारकरी संप्रदायाचा मोठा परिणाम आंध आदिवासी जमातीवर झालेला आहे. त्यामुळे समाजात वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा निर्माण झालेली असून दिंडी आणि पालख्यांना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. या आंध आदिवासी जमातीतील थोर संत श्रीराम बापू मेटकर व त्यांची शिष्य परंपरा यांचा या समाजावर मोठा प्रभाव आहे. तसेच श्री फुलाजी महाराज व भिकाजी भिलाजी भुरके महाराज यांचाही या जमातीवर मोठा प्रभाव निर्माण झाला आहे.

- **प्रकरण पाचवे : आंध आदिवासी जमातीच्या आर्थिक परिस्थितीचा ऐतिहासिक अभ्यास**

या प्रकरणांमधून आंध आदिवासी जमातीची आर्थिक परिस्थिती कशी होती व आर्थिक दृष्ट्या बदल झाला का? झाला तर काय झाला आणि कशा पद्धतीने झाला याचे ऐतिहासिक अवलोकन करणे या संशोधनाचे मुख्य ध्येय आहे.

- **प्रकरण सहावे : उपसंहार व निष्कर्ष**

वरील प्रमाणे प्रकरणाच्या अभ्यासातून प्राप्त झालेल्या गृहीतकाची पडताळणी केली जाईल. शेवटी संशोधनातून हाती आलेल्या निष्कर्षाची मांडणी करण्यात येईल.

- **परिशिष्टे**

फोटो, मुलाखतीच्या नोंदी, प्रत्यक्ष भेटीच्या नोंदी, प्रश्नावली.

(वरील प्रकरणांमध्ये संशोधनाअंती बदल होण्याची शक्यता आहे)

संदर्भ ग्रंथ सूची

१) डॉ. गोविंद गारे, पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी, श्री विद्या प्रकाशन शनिवार पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, २००१

२) तुकाराम भिसे, आंध जमातीचा प्राचीन वांशिक व राजकीय इतिहास, निर्मल प्रकाशन नांदेड, प्रथम आवर्ती ,२०१८

३) डॉ. पुष्पा यशवंत गावित, आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य, अथर्व पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, २०१४

४) डॉ. शौनक कुलकर्णी, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन, द्वितीय आवृत्ती, २०२०

५) डॉ. माधव सरकुंडे, वाडा, देवयानी प्रकाशन यवतमाळ, प्रथम आवर्ती ,१९९६

६) डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, सातवाहन कालीन महाराष्ट्र,प्रतिमा प्रकाशन,द्वित्तीय आवृत्ती, १९९३

७) डॉ. गोविंद गारे, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन ,पुणे

८) डॉ. गोविंद गारे, आदिवासी कला, विद्या प्रकाशन, पुणे

९) आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन, वार्षिक आदिवासी उपाय योजना अहवाल

१०) Ed. Sachchidanand, Profile of Indian tribes (Maharashtra)

११) tribal Research and training institute, m.s Pune, Univarsal Banchmark Survey,1980 (Household) Statistical table No 1 to 12 (१९८५)

१२) महाराष्ट्र राज्य गॅजेट, महाराष्ट्र : भूमी व लोक ,(१९९६)

१3) डॉ. गोविंद गारे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य पुणे, दि रिव्ह्यू ऑफ रिसर्च स्टडीज ऑन ट्राईब

१४) शेषेराव एन मडावी, दंडार आणि आदिवासी संस्कृती, सुधीर प्रकाशन,२०१९

१५) भांडारकर पू. ल, सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपूर, तृतीय आवर्ती, १९८७

१६) संत दू . का, शोध विज्ञान कोश, पुणे विद्यार्थी प्रकाशन ग्रह, सदाशिव पेठ, पुणे

१७) संत त दू . का, संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग, पुणे विद्यार्थी प्रकाशन ग्रह, सदाशिव पेठ पुणे, (पुनर्मुद्रन आवर्ती), २००७

१८) देव प्रभाकर, इतिहास शास्त्र : संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेन टॉनिक प्रकाशन ग्रह, चेरीहील नाशिक- ४२२०१३

१९) कार ई. एच, इतिहास म्हणजे काय? , कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथम आवर्ती, लेले वि.गो (अनुवादक)

२०) देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, प्रथम आवर्ती, १९९७

२१) डॉ.प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, सातवी आवर्ती, जानेवारी ,२०२०

संशोधक विद्यार्थी

गारोळे साहेबराव शंकर
garolesahebrao95@gmail.com
मो.नं. : 9359653608

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बोकारे तुकाराम एकनाथराव
tukarambokare58@gmail.com
मो.नं. : 7350333214